**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रमेश देवराम टाकळकर
मु.पो.पिंपळे जगताप, ता.शिरुर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक,**
पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय,
चव्हाणनगर, पाषाण, पुणे-८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मु.),**
पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय,
चव्हाणनगर, पाषाण, पुणे-८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/०४/२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/०४/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रिलायन्स पेट्रोलियम कंपनीला १९६२ च्या वायुवाहीनी कायद्यातील कोणत्या कलमान्वये काम करण्यासाठी पोलीस बंदोबस्त देण्यात आला याबाबतची माहिती तसेच या संदर्भात पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाकडून शिकरापूर पोलीस स्टेशनला पाठविलेल्या पत्राची छायाप्रत | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२९/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. रमेश देवराम टाकळकर हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्यास त्यांच्या मागणी प्रमाणे दि. ३०/०४/२००८

रोजीच्या पत्रान्वये मुदतीत माहिती देण्यात आली आहे', असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मु.), पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय, यांचे प्रतिनिधी श्री. हिमतसिंग घाटगे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय, श्री.अशोक मोराळे यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अनिल एस भांडेकर
रा.ओम-ॲन इंस्टीटयुट ऑफ सोशल लीगल सर्व्हीसेस,
५/१३६३, कृष्णा अपार्टमेंट, जे.एम.रोड,
शिवाजीनगर, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
परिमंडळ-३, पुणे शहर, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९/०९/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १/१०/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/१०/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उप आयुक्त झोन-३ यांनी दि.२१/०८/२००८ रोजी काढलेल्या तडीपारीच्या आदेशासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अनिल एस. भांडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या माहिती मागणीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर पुणे व यांनी माहिती दिली असल्याचे दिसून येते. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अनिल यशवंत पाटील
६२, जुना बाजार, जैन मंदिराजवळ,
खडकी, पुणे -३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक उच्च शिक्षण,**
पुणे विभाग, १७ डॉ. आंबेडकर रोड,
पुणे-४११००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सहसंचालक उच्च शिक्षण,
पुणे विभाग यांचे कार्यालय, १७ डॉ. आंबेडकर रोड,
पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१/०७/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/०८/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७/१०/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९५-०८ या कालावधीत टिकाराम जगन्नाथ खडकी या महाविद्यालयाला भूगोल या विशेष विषयासाठी मिळालेल्या अनुदानासाठी | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. अनिल

यशवंत पाटील हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्याच्या माहिती -मागणी अर्जाच्या संदर्भातील माहिती ही माहिती टिकाराम जगन्नाथ महाविद्यालयाच्या स्तरावरील असल्याने महाविद्यालयाकडून घ्यावी, असे अपीलकर्त्यास मुदतीत कळविण्यात आले होते. तथापि त्यानुसार अपीलकर्त्याने महाविद्यालयाकडून माहिती न घेतल्यामुळे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी माहिती महाविद्यालयाकडून मागवून घेऊन अपीलकर्त्यास पुरविलेली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे विभाग, डॉ.एन.एम.कडू यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अच्युत फडके
अंकिता चेंबर, सी.टी.एस.नं.३५,
शिवाजी रोड, शुक्रवार पेठ,
पुणे-२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
पुणे शहर विभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक,**
खडक पोलीस स्टेशन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११/०५/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/०७/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मुंबई म्युनसिपल कामगार कायदा, १९५० अन्वये परवान्याशिवाय हॉटेल व्यवसाय चालवणाऱ्या व्यक्तिवर कारवाई करणार का, जर कारवाई करणार नसतील तर कोण अधिकारी कारवाई करु शकतील याबाबतचा खुलासा | |

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२९/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्याच्या तक्रारीनुसार करण्यात आलेल्या कारवाईबाबतची माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे', जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन, पुणे श्री.एस.बी.ओहोळ यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यांची मूळ मागणी ही परवान्याशिवाय हॉटेल व्यवसाय चालवणाऱ्या व्यक्तिवर कारवाई करावी, ही असून सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनयम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी कारवाई करुन अपीलकर्त्यास कळविले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अनिल रतनचंद शहा
१३४/२, शुक्रवार पेठ, रत्नगरी अपार्टमेंटसमोर,
शिंदेआळी कॉर्नर, पुणे-२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विक्रीकर सहआयुक्त (व्य.कर),
पुणे क्षेत्र, ३रा मजला, विक्रीकर भवन, येरवडा, पुणे-६ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवसायकर अधिकारी क्र.६,
पुणे क्षेत्र, ३रा मजला, विक्रीकर भवन, येरवडा, पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अनिल रतनचंद शहा
१३४/२, शुक्रवार पेठ, रत्नगरी अपार्टमेंटसमोर,
शिंदेआळी कॉर्नर, पुणे-२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विक्रीकर सहआयुक्त (व्य.कर),
पुणे क्षेत्र, ३रा मजला, विक्रीकर भवन, येरवडा, पुणे-६ श्री. सतिश ज्ञा. भंडारे

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवसायकर अधिकारी क्र.६,
पुणे क्षेत्र, ३रा मजला, विक्रीकर भवन, येरवडा, पुणे-६ श्री. म.गो.महाले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सन १९९२ पासून काही फर्म व्यवसायकर भरत नसल्याचे आपण जन माहिती अधिकारी तथा व्यवसायकर अधिकारी क्र.६, येरवडा, पुणे यांना कळविले. अशा संस्थांची यादी देऊनही वसुली केली गेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अनिल रतनचंद शहा यांनी केली.

अपीलकर्ता श्री. शहा यांनी माहितीपेक्षा प्रशासकीय कार्यवाहीची मागणी केली होती. कार्यालयाकडील उपलब्ध माहिती त्यांचा अर्ज आल्यापासून पंधरा दिवसांत पाठविली. परंतु माहिती अपुरी असल्याची व योग्य कार्यवाही न केल्याची तक्रार श्री. शहा यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्य.कर) यांच्याकडील सुनावणीदरम्यान केली. जन माहिती अधिका-यांनी कोणतीही माहिती दडविलेली नाही. परंतु श्री. शहा यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संबंधित व्यापा-यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी तपासणी करुन करदेयक निश्चित करुन पुढील कार्यवाही करावी लागेल. त्यामुळे व्यवसायकर अधिका-यांनी अशी कार्यवाही करुन दोन महिन्यांत माहिती अपीलकर्त्यास पुरवावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्य.कर) येरवडा, पुणे श्री. सतीश ज्ञा. भंडारे यांनी दिले. त्यानुसार प्राप्त झालेली माहिती श्री. शहा यांना दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा व्यवसायकर अधिकारी क्र.६, येरवडा, पुणे श्री. म.गो.महाले यांनी केले. सन २००८ मधील वसुली करण्यात आली आहे. सन १९९२ पासूनचा तपशील पडताळून कार्यवाहीबाबतचा अभिप्राय देता येईल, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्य.कर) येरवडा, पुणे श्री. सतीश ज्ञा. भंडारे यांनी केले.

अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात दिलेल्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्य.कर), येरवडा, पुणे श्री. सतीश ज्ञा. भंडारे यांनी दि. २७.४.२०१० च्या पत्रान्वये संबंधित माहितीच्या

प्रतीसह आयोगाला सादर केला. अपीलकर्त्याची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. वसुली करुन माहिती द्यावी, अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश नानासाहेब वाघेरे
पिंपरी गाव, पोस्ट ऑफिस समोर,
पिंपरी वाघिरे, पिंपरी, पुणे-१७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८
डॉ. नागकुमार कुणचगी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१२.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.३.२००६ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. नागकुमार कुणचगी यांच्याकडील कारभाराच्या व त्यांच्या कामकाजाच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी म्हणून त्यांनीच नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ यांनी अपील अंशतः मान्य केले व माहिती देण्याचे आदेश दिले. तरीही आपल्याला पूर्ण माहिती दिली गेलेली नाही, याच मागणीसाठी केलेल्या अन्य एका अपिलात (अपील क्र.१७८५/पुणे) विस्तृत स्वरूपातील माहितीबाबत अभिलेखाचे अवलोकन करु द्यावे व विशिष्ट संदर्भातील माहिती मागितली असली तरी ती माहिती द्यावी, असे आदेश आयोगाने दि.२९.९.२०१० रोजी दिले होते. परंतु कोणतीही माहिती डॉ. कुणचगी विहित मुदतीत व परिपूर्ण देत नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रमेश नानासाहेब वाघेरे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

डॉ. कुणचगी हे स्वतः जन माहिती अधिकारी असून मागितलेली माहिती त्यांच्या स्वतःच्या सेवा कालावधीतील कार्यालयीन संदर्भातील आहे. तरीही माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार ही माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याचे त्यांनी स्वतःच नमूद करुन त्रयस्थ पक्षाची हरकत असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे अपीलकर्त्यास कळविले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील त्रयस्थ पक्षाविषयीचा अयोग्य व सोईस्कर असा अर्थ लावून डॉ. कुणचगी यांनी कृती केली आहे. 'श्री. वाघेरे यांनी आपल्या कालावधीतील न्यायालयीन दाव्यांची व अन्य व्यक्तिगत माहिती मागितली होती. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या दाव्यांमध्ये या माहितीमुळे आपले व्यक्तिगत नुकसान होण्याचा संभव होता, म्हणून आपण हरकत नोंदवून माहिती नाकारली,' असे स्पष्टीकरण डॉ. कुणचगी यांनी दिले. तथापि ते रास्त नाही. श्री. वाघेरे यांनी डॉ. कुणचगी यांच्या संदर्भातील खाजगी स्वरूपातील माहिती मागितलेली नाही, तर महानगरपालिकेच्या सेवेतील त्यांच्या कामाची व अनुषंगिक बाबींसंदर्भातील माहितीच मागितली आहे. मुद्दा क. ९ व १० - मधील मागणीनुसार सरसकट व विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्त्याने मागितली असेल तेथे अभिलेखाचे अवलोकन करू देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकाऱ्यांनी करणे शक्य असल्याचे व अन्य माहिती मुद्देनिहाय, स्पष्ट स्वरूपात देणे आवश्यक असल्याचे आयोगाने दि. २९.९.२००९ च्या निर्णयात आदेशित केले होते.

अपील क्र. १७८७ मधील आयोगाच्या दि. २९.९.२००९ च्या आदेशानंतर डॉ. कुणचगी यांनी माहिती संकलनासाठी वेळ लागणार असल्याचे व 'लवकरात लवकर माहिती एकत्र करुन अवलोकनार्थ सादर करण्यात येईल,' असे श्री. वाघेरे यांना दि. १८.१२.२००९ च्या पत्रान्वये म्हणजे आयोगाच्या आदेशानंतर ७९ दिवसांनी कळविले. आठ विभागांकडून माहिती संकलित करण्याचे त्यांनी म्हटले आहे. दि. २७.११.२००९ व दि. ३०.११.२००९ रोजी (प्रशासकीय विभाग) व अन्य सहा विभागांना दि. १६.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी कळविले. एखाद्या विभागाकडून दि. १.१२.२००९ रोजी व प्रशासकीय विभागाकडून दि. २२.१२.२००९ रोजी माहिती प्राप्त झाली, ती श्री. वाघेरे यांना कळविण्यात आली. अन्य विभागांकडून प्राप्त झालेली माहिती शुल्क रु. ३४/- भरुन घेऊन जाण्याबाबत श्री.वाघेरे यांना दि. १.२.२०१० रोजी बदलेलेल्या व्यवस्थेतील जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी कळविले. बदललेल्या व्यवस्थेतील अपिलीय प्राधिकारी म्हणून डॉ. कुणचगी यांनी दि. १७.४.२०१० रोजी या तपशिलाचे निवेदन आयोगाला सादर केले. माहिती देण्यास विलंब झाला आहे, त्याबद्दल आपण दिलगीरी व्यक्त करीत असून शास्ती करु नये, अशी विनंती डॉ. कुणचगी यांनी केली.

डॉ. कुणचगी यांचे निवेदन लक्षात घेता माहिती देण्याबाबत कोणतीही तत्परता त्यांनी दर्शविलेली नाही. अभिलेखाचे अवलोकन करु देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात माहिती संकलनाचा प्रश्न येत नाही. तरीही तसे कारण दर्शवून त्यांनी विलंबाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. माहिती देण्याबाबत संबंधित विभागांना त्यांनी कळविले, असे मान्य केले तरी वस्तुतः अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या दि. २४.४.२००६ च्या निर्णयानंतरच त्यांनी ही कृती करणे आवश्यक होते, ते त्यांनी केलेले नाही. त्यांच्या निवेदनानुसार आयोगाच्या दि. २९.९.२००९ च्या निर्णयानंतरही दोन महिन्यांनी त्यांनी ही कृती केली आहे.

या सर्व बाबी लक्षात घेता विलंब क्षमापित करण्याची त्यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे. ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे डॉ. नागकुमार कुणचगी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल ते शास्तीस पात्र आहेत. त्यांना एकूण रु. २५०००/- एवढी शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती मे, जून व जुलै २०१० या महिन्यांच्या जून, जुलै व ऑगस्ट २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून तीन समान हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे ४११ ००१

संजय विजय भिडे **अपीलकर्ता**
१११९/१, उत्तर शिवाजीनगर,
कै. विष्णू विनायक भिडे मार्ग,
गणपती गॅस गोडावून जवळ,
सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उप महानिरिक्षक व मुद्रांक उप नियंत्रक,** उत्तरवादी
पुणे विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला , पुणे-१

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग १,**
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,
राजवाडा परिसर, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१/०८/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४/०९/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६/११/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील तरतूदीनुसार नोंदणी फीचा दर, दंडाची आकारणी कशी व कशाच्या आधारे करण्यात येते यासंबंधीची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय विजय भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल दाखल केले होते. दरम्यानच्या काळात श्री.भिडे यांचे दि. २८/१/२०१० रोजी निधन झाले असून दि. २६/३/२०१० रोजीचा मृत्यू दाखला सक्षम प्राधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी आयोगास सादर केला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. महादेव विठोबा हाडवळे
रा.आवटेमळा (तर्फे बेल्हा),
ता.जुन्नर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
पुणे ग्रामीण, पोलीस अधीक्षक कार्यालय पुणे,

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,**
जुन्नर जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०४/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८/११/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अपीलकर्त्याने दिलेल्या फिर्यादीची नारायणगांव पोलीस ठाण्यामध्ये रजिस्टरला नोंद होण्याबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. महादेव विठोबा हाडवळे हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याने माहिती अर्जामध्ये नमूद केलेला मजकूर हा तक्रार स्वरुपाचा असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नसल्याने अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकारी, जुन्नर यांना समक्ष भेटून त्याबाबतची लेखी तक्रार द्यावी, असे

अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, यांनी दि.१९/११/२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यांस कळविलेले आहे', असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, बारामती श्री. प्रविण पाटील यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रोहिदास बाबुराव साकुळे
अे-१५, सेवक निवास, आरोग्य केंद्रामागे, पुणे विद्यापीठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रोहिदास बाबुराव साकुळे
अे-१५, सेवक निवास, आरोग्य केंद्रामागे, पुणे विद्यापीठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती ए.व्ही.चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.१०.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.११.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.रोहिदास बाबुराव साकुळे यांनी मागितलेली माहिती व त्यांच्या मुलाच्या एम.ए.(राज्यशास्त्र) परीक्षेतील गुणांच्या अनुषंगाने कागदपत्रे व अन्य माहिती विहित मुदतीत दिली. सन २००० ते २००७ या काळातील निकालाबाबतची जात संवर्ग / प्रवर्गनिहाय माहिती त्यांनी मागितली होती. अशी माहिती ठेवली जात नाही, असेही कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती ए.व्ही.चव्हाण व अपिलीय प्राधिकारी कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रविण ज्ञानदेव शिंदे
सरकारी दवाखान्यासमोर,
मु.पो.व ता.बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय बारामती,
जि.पुणे.

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय बारामती,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६१/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०/०५/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०६/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/०७/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५/०८/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तहसीलदार बारामती यांनी दि.२/०५/२००५ च्या आदेशानुसार नोंद होण्यासाठी किती कालावधी लागता, तसेच त्यावर कार्यवाही करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत व शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या संदर्भात खुलासेवजा माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता श्री. प्रविण ज्ञानदेव शिंदे यांना त्यांच्या मागणीप्रमाणे विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे. ७/१२ च्या वहिवाटसदरी नोंद लावून

मिळावी, अशी अपीलकर्त्याची मूळ मागणी असून सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती श्री.बी.जे.गोरे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. ज्ञानदेव नामदेव जामदार
मु.पो.इंदापूर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी,**
इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६२/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे कसबे इंदापूर येथील सर्व्हे नं.१०५/२ वरील फेरफार नं.४६४५ व ४७३८ च्या वारसा नोंदीच्या संदर्भातील कागदपत्रे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. ज्ञानदेव नामदेव जामदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने 'अपीलकर्त्यास त्वरित माहिती देण्यात यावी, अन्यथा शास्तीची कार्यवाही करण्यात येईल', असे आयोगाच्या दि.१८/०८/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, इंदापूर, ज़ि.पुणे यांना कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने अपीलकर्त्यास दि. २/३/२००९ रोजी समक्ष माहिती देऊन पोहोच घेण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, इंदापूर, यांनी दि. ४/०९/२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिलीप ज्ञानोबा देवकर
५४५, घोरपडे पेठ,
पुणे-४२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वैद्यकीय अधिकारी,**
पुना हॉस्पिटल, २७, सदाशिव पेठ,
पुणे-३०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,**
पुना हॉस्पिटल, २७, सदाशिव पेठ,
पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०४/२००८, १६/५/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५/०५/२००८, २८/५/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/०९/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्रीमती सुलेखा कुमार शिंगाडे यांच्यावर मानसोपचारतज्ञ डॉ.विद्याधर बाटवे यांचेमार्फत करण्यात आलेल्या उपचारांबाबतची माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. दिलीप ज्ञानोबा देवकर हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही तीन वर्षांपूर्वीची असून

महाराष्ट्र शासनाच्या दि. २/०२/१९६८ च्या शासन निर्णयानुसार बाहय रुग्ण विभागाचे (O.P.D) केस पेपर हे तीन वर्षांनंतर नष्ट करण्यात येतात. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देण्यात आलेली नाही', असे जन माहिती तथा वैद्यकीय अधिकारी, पूना हॉस्पिटल, पुणे श्री. चारुहास प्रभाकर ठकार यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विकास सदाशिव लवांडे
मु.शिंदेवाडी, पो.अष्टापूर,
ता.हवेली, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा **गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती हवेली,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा **कक्ष अधिकारी,**
पंचायत समिती हवेली,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८/०७/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/१२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२/०८/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.बी.डी.पवार, विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्या सेवातपशिलाबाबतची माहिती, तसेच शिंदेवाडी ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षण अहवालात दोषी आढळलेल्या सरपंच व ग्रामसेवक यांच्यावरील कारवाईबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१८/०३/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. विकास सदाशिव लवांडे हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती - मागणी अर्जानुसार उपलब्ध

माहिती वाढीव मुदतीत देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, हवेली व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. शिंदेवाडी ग्रामपंचायतीतील लेखापरीक्षण अहवालातील दोषी पदाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा नोंदवावा, ही अपीलकर्त्याची मूळ मागणी असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. देवीचंद भबुतमलजी जैन
१२५४(नवा), भवानी पेठ,
पुणे-२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुणे परिमंडळ, रास्ता पेठ, पुणे-११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता** (प्रशासन-१),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुणे परिमंडळ, रास्ता पेठ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८२/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/०९/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/११/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/१२/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** घर नं. १३५, नाना पेठ, विठ्ठल स्मृती सोसायटीमधील दुकानांना केलेल्या वीजपुरवठयाच्या अनुषंगाने ४ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि. २४/०२/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्यास उपलब्ध असणारी सर्व माहिती दिलेली आहे. नियमानुसार कनेक्शनचे पैसे न भरता स्वत:च्या मालकीच्या सदनिकेस

वीजपुरवठा करावा, ही अपीलकर्त्याची मूळ मागणी आहे', असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन-१), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच 'पेमेंन्टची पावती दाखवूनदेखील वीज पुरवठा करीत नाहीत', असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंदुलाल हंसराज पोकार
२, ग्रीन हार्वेस्ट सोसायटी, मगरपट्टा सिटी मेन
गेटसमोर, मगरपट्टा रोड, हडपसर, पुणे-४११ ०२८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, हडपसर सर्कल,
फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता :** श्री. चंदुलाल हंसराज पोकार<br>२, ग्रीन हार्वेस्ट सोसायटी, मगरपट्टा सिटी मेन<br>गेटसमोर, मगरपट्टा रोड, हडपसर, पुणे-४११ ०२८<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, हडपसर सर्कल,<br>फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे श्री. आर. ए. शेख<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, फुरसुंगी,<br>ता. हवेली, जि. पुणे श्री. एस. डी. देशमुख | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.११.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

चुकीची फेरफार नोंद केली व १४ महिन्यांच्या विलंबाने ती दुरुस्त केली, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा तलाठी फुरसुंगी, ता. हवेली यांनी विलंबाने, अपुरी व चुकीची दिली. तसेच अनेक बाबींचा खुलासा आपण विचारला असता तो दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. चंदुलाल हंसराज पोकार यांनी केली.

श्री. पोकार यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या स्तरावर उपलब्ध नव्हती. संबंधित कागदपत्रे तहसीलदार कार्यालयाकडे जमा केली असल्याचे त्यांना वेळोवेळी स्पष्ट केले होते. तसेच दस्तामधील त्रुटी लक्षात आल्यानंतर पुनर्विलोकनासाठी प्रकरण तहसीलदारांकडे पाठविले होते. त्यांनी पुनर्विलोकन करुन फेरफार रद्द केला. पुनर्विलोकन प्रक्रियेच्या विलंबाबाबत श्री. पोकार यांचा आक्षेप आहे. परंतु ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. उलट प्रशासकीय कार्यवाही करुन माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, फुरसुंगी श्री. एस. डी. देशमुख व अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, हडपसर श्री. आर. ए. शेख यांनी केले. त्यांची निवेदने व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील अनेक मुद्दे खुलासा, स्पष्टीकरण, भाष्य यांची मागणी करणारे असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ